Journal details from UGC Website.

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Tifan (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | तिफण (print only) |
| **Publication Language** | Marathi |
| **Publisher** | Tifan |
| **ISSN** | 2231-573X |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Language |
| **Focus Subject** | Marathi |

KVN Naik Arts, Commerce & Science College, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

Copyright © 2021 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer

Journal details from UGC website



ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

वर्ष : ११ वे अंक : १ ला
एप्रिल, मे, जून २०२०

# समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक

ATTESTED

PRINCIPAL
LOKNETE GOPINATHJI MUNDE
Institute of Engineering Education & Research
Canada Corner Nashik-422 002

# – अनुक्रमणिका –


१. मराठी कथा: संकल्पना व स्वरूप /
डॉ. नाना झगडे ........................................ ९

२. मराठी कथेची वाटचाल /
डॉ. श्रीराम गडकर ........................................ ११

३. कथेचे घटक व प्रकार /
डॉ. संजय शिंदे ........................................ ३२

४. कथेचा आस्वाद हा आनंदानुभव /
डॉ. राजेंद्र थोरात ........................................ ३९

५. विचारप्रवृत्त व अंतर्मुख करणारी कथा
'जेव्हा मी जात चोरली होती' /
डॉ. विजय बालघरे ........................................ ४४

६. शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी वास्तव कथा 'लाल चिखल' /
डॉ. विजय केसकर ........................................ ५६

७. विचार आणि चिंतनाचा पाऊस : 'पाऊस आला मोठा' /
डॉ. वर्षा तोडमल ........................................ ६१

८. विद्रोहाला शक्ती व व्यापकता देणारी कथा – 'उठावण' /
डॉ. महादेव कांबळे ........................................ ६७

९. प्रस्थापित व्यवस्थेला इशारा देणारी कथा – 'उठावण' /
डॉ. प्रवीण ताटे – देशमुख ........................................ ७२

१०. आदिवासींच्या व्यथा, वेदना व संघर्षाचे दर्शन : 'बाजा' /
डॉ. कैलास महाले ........................................ ८२

११. मुक्या सुरांचा 'बाजा' /
डॉ. हनुमंत भवारी ........................................ ९१

१२. वैद्यकीय पेशातील प्रवृत्तींवर प्रकाश टाकणारी कथा
'दगड दवाखाना' /
डॉ. राहुल जगदाळे ........................................ १००

१३. नातेसंबंधातील ताण-तणाव प्रदर्शित करणारी कथा 'वापसी' /
डॉ. प्रतिभा शंकर घाग-सोनी ........................ ११३

१४. प्रसंगनिष्ठ विनोदातून लोकप्रबोधन करणारी कथा
'शुभमंगल सावधान' /
डॉ. नानासाहेब पवार ...................... .......... ११८

१५. श्रमप्रतिष्ठा व ध्येयवाद जागवणारी कथा 'कष्टाची भाकरी' /
डॉ. हरेश संपत शेळके ................................. १२८

१६. भाषिक कौशल्ये विकास /
डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे ................................. १३२

१७. आकलनासह श्रवण कौशल्य /
डॉ. तुषार चांदवडकर ................................. १४०

१८. संभाषण कौशल्याचे स्वरूप, महत्त्व
व सुधारणेसंदर्भातील उपाय /
डॉ. राहुल अशोक पाटील ................................. १४४

१९. वाचन कौशल्य /
डॉ. संदीप रंगनाथ तापकीर ................................. १५३

२०. लेखन कौशल्य
डॉ. कीर्ती मिलिंद मुळीक................................. १६१

२१. ई- संवादाचे स्वरूप व विविध माध्यमे /
डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे ................................. १६४

२२. सारांश लेखन /
डॉ. नितीन कल्याण मोटे ................................. १७५

२३. सिन्नर महाविद्यालयात पदवी शिक्षण घेणाऱ्या
विद्यार्थ्यांचा वाचन अभिरूचीचा अभ्यास /
डॉ. सुभाष बंडू अहिरे ................................. १८३

# १६. भाषिक कौशल्ये विकास

– डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे –
क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक महाविद्यालय, नाशिक
ई- मेल : rrsangle@gmail.com भ्रमणध्वनी: ९४०४९८५६८८

---

भाषा ही मानवाला मिळालेली सर्वोत्तम नैसर्गिक देणगी आहे. त्यामुळे मानवाची जीवनदृष्टी व विचारशक्ती विकसित होते. डॉ. जॉन ड्युई म्हणतात त्याप्रमाणे, समाजाच्या व व्यक्तिशः मानवाच्या अस्तित्वाला व विकासाला भाषा कारणीभूत ठरते. कोणताही अनुभव अथवा ज्ञान आपण भाषेच्या माध्यमातून ग्रहण करीत असतो. कुठल्या विषयाचे ज्ञान मिळवण्यासाठी आणि ते व्यवस्थित आत्मसात करण्यासाठी भाषेला कौशल्याची जोड द्यावी लागते. म्हणूनच व्यक्तिमत्त्व विकासात भाषिक कौशल्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. चांगल्या कौशल्यांचा परिपूर्ण विकास होणे हे निकोप व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे लक्षण मानले जाते. थोडक्यात भाषेचे अध्ययन म्हणजे एका अर्थाने भाषिक कौशल्यांचा विकास होय.

भाषा हा मानवी विचार देवाण- घेवाणीचा महत्त्वाचा घटक आहे. भाषेच्या माध्यमातूनच अनेक पातळ्यांवरील मानवी व्यवहार शक्य होतात. त्यामुळे भाषेत प्रवाहीपणा असेल तर ते अधिक प्रभावी होईल. यासाठी काही कौशल्य आत्मसात करणे महत्त्वाचे ठरते. भाषिक कौशल्यांचा विचार करताना श्रवण, वाचन, भाषण, लेखन या विविध कौशल्यांचा विचार करता येईल. ही चारही महत्त्वाची भाषिक कौशल्ये आहेत. यापैकी श्रवण आणि वाचन ही दोन कौशल्ये ज्ञान व माहिती घेणारी असून उर्वरित दोन ही विचार व ज्ञान देणारी कौशल्ये आहेत. पहिल्या दोन कौशल्यांच्या आधारे मानव बहुश्रुत होत असतो तर उर्वरित कौशल्यांचा वापर करून माणसातील सर्जनशीलता फुलत असते. शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत ही कौशल्ये आपण टप्याटप्याने आत्मसात करीत असतो. नोकरी किंवा व्यवसायाच्यानिमित्ताने या कौशल्यांचा आपल्याला उपयोग होत असतो. अशावेळी कौशल्यांचे केवळ पुस्तकी ज्ञान असून चालत नाही तर त्यांचे उपयोजनही तितकेच महत्त्वाचे ठरते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम वर्ष कला शाखेच्या मराठी विषयाच्या पहिल्या सत्रासाठी या सर्व कौशल्यांचा अभ्यासक्रमात समावेश केला आहे. केवळ मराठीच नव्हे तर महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना विविध विषयांचा अभ्यास करावा लागतो. या सर्व विषयांच्या अध्ययनात या कौशल्यांचा खुबीने उपयोग करून घेतल्यास अध्ययन प्रभावी होते. भाषिक कौशल्ये ज्ञात असलेल्या विद्यार्थ्याला विषयाचे आकलन जलद गतीने होण्यास ही कौशल्ये सहाय्यभूत ठरतात.

मातृभाषा आपण थोडेसे परिश्रम करून सहजपणे शिकू शकतो मात्र या भाषेचा व्यवहारात उपयोग करण्यासाठी काही भाषिक कौशल्ये आत्मसात करावी लागतात. अशा श्रवण, वाचन, भाषण आणि लेखन या कौशल्यांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**श्रवण कौशल्ये :**

आता कोणी सहजपणे असे म्हणू शकेल की, ऐकण्यात कसले आले कौशल्य? निसर्गातील कोणताही आवाज आपली इच्छा असो अथवा नसो आपल्याला ऐकावाच लागतो. पण वाटते तितकी ही प्रक्रिया सोपी नाही. आपण कानांनी ऐकत असलो तरी या प्रक्रियेत मेंदूचा मोठा सहभाग असतो. आलेला आवाज नेमका कुणाचा आहे, त्याची तीव्रता, त्यातील भाव, चढ- उतार यावरून मेंदू काही अर्थ लावत असतो. त्या अर्थबोधानुसार आपल्या शरीराची प्रतिक्षिप्त क्रिया घडत असते. उदा. तुम्ही जंगलात गेलात आणि तुम्हाला वाघाची डरकाळी ऐकू आली तर साहजिकच मोठ्या संकटाची जाणीव मेंदूकडून आपल्याला करून दिली जाते. त्यावर आता येथे थांबणे उचित नाही ही प्रतिक्रिया आपणाकडून अगदी सहजपणे घडते. वर सांगितलेल्या आवाजासारखे निसर्गात अनेक ध्वनी निर्माण होत असतात. मानवाकडूनसुद्धा मर्यादित पण विविध भाषा ध्वनीची निर्मिती केली जाते. या सर्व ध्वनींचे आणि त्यांच्या अर्थाचे वर्गीकरण मानवी मेंदू करीत असतो. हे करताना अनेक जैविक क्रिया घडत असतात. मेंदूचे अर्थनिर्णयन हे आपण आवाज कसा ऐकतो, यावर अवलंबून असते. म्हणून कोणत्याही आवाजाचे काळजीपूर्वक श्रवण करणे महत्त्वाचे ठरते. चांगले व सुस्पष्ट ऐकण्याची आपली क्षमता विकसित करण्याला आपण 'श्रवण कौशल्यांचा विकास' म्हणू शकतो. श्रवण हे कौशल्य नैसर्गिक असले तरी त्याचा विकास मानवाला परिश्रमपूर्वक करावा लागतो. हे कौशल्य भाषिक विकासातील पायाभूत कौशल्य आहे. चांगले ऐकले तर चांगले बोलता येते. त्यामुळे इतर भाषिक कौशल्य विकासात श्रवण कौशल्याची भूमिका महत्त्वाची ठरते.

ऐकणे आणि श्रवण करणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. ऐकणे ही स्वाभाविक क्रिया आहे तर श्रवण ही हेतुपूर्वक करावयाची एक मानसिक प्रक्रिया आहे. त्यामुळे नीट ऐकणे, लक्षपूर्वक ऐकणे, तल्लीन होणे, अवधान देणे, चित्त स्थिर ठेवून ऐकणे या गोष्टी आपल्याला लहानपणापासून सांगितल्या जातात. थोडक्यात, कानावर सहज पडणारे ध्वनी म्हणजे ऐकणे तर विशिष्ट हेतूने लक्ष देऊन ऐकणे म्हणजे श्रवण. असे म्हणतात की, आपण श्रवण केलेल्या गोष्टींचा फक्त एक दशांश भाग आपल्या लक्षात राहतो. यावरून श्रवण ही गुंतागुंतीची व अवघड प्रक्रिया आहे म्हणून चांगले ऐकणे, श्रवण करणे यासाठी आपल्याला जाणीवपूर्वक मेहनत घेऊन हे कौशल्य विकसित करावे लागते. सातत्यपूर्ण प्रयत्न, निकोप मानसिकता आणि एकाग्रता यांआधारे

श्रवण कौशल्य व्यवस्थित आत्मसात करता येते.

श्रवण कौशल्यांचा विचार करताना अवतीभोवतीच्या परिघातील अनेक शब्द कानावर येत असतात तेव्हा त्याचा संचय होऊन शब्दसाठा तयार होतो. श्रवण काळजीपूर्वक होणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी लक्ष केंद्रित करणे, त्या विषयात रस घेणे, विषयात समरस होणे त्यामुळे श्रवण क्षमता अधिकाधिक विकसित होत जाते. त्यामुळे इतर भाषिक कौशल्यांसाठी याचा फायदा होतो. भाषेतील शब्दसंग्रह, वाक्याची रचना, पर्यायी शब्दांचा वापर या आधारानेच सर्व कौशल्यांचा प्रगल्भ अनुभव घेता येतो. प्रभावी कौशल्य असणे म्हणजेच विचारांचे आदान-प्रदान होण्यासाठी एक महत्त्वाचे साधन आहे. श्रवण कौशल्यात आकलन क्षमता आणि त्याचा अन्वयार्थ, शब्द सामर्थ्य या घटकांना महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे श्रवण ही निष्क्रिय क्रिया नाही तर सक्रिय सहभागाची क्रिया आहे.

ऐकणे आणि समजून घेणे या दोन क्रिया श्रवणात होत असतात. नुसते ऐकणे नव्हे तर अर्थपूर्ण ऐकणे म्हणजे 'श्रवण' होय. त्यामुळेच श्रवण ही ज्ञान मिळविण्याची गुरूकिल्ली आहे, असे म्हटले जाते. श्रवण प्रक्रियेतील अडथळे दूर करून आपण चांगले ऐकू शकलो तर निश्चितच त्याचे दूरगामी फायदे होतात. आता विज्ञान आणि तंत्रज्ञानाने इतकी प्रगती केली आहे की, शारीरिक व्यंगामुळे श्रवण प्रक्रियेत काही अडथळे येत असतील तर त्यावरसुद्धा मात करता येते.

**भाषण कौशल्ये :**

चांगले ऐकले तर चांगले बोलता येते. व्यक्तीचे श्रवण कौशल्य चांगले असेल तर निश्चितच त्याचा चांगला परिणाम बोलण्यावर होतो. भाषा आपण अनुकरणाने शिकत असतो. त्यामुळे जे व जसे शब्द आपल्या कानावर पडतात तसेच शब्द बोलण्याचा आपण प्रयत्न करतो. साहजिकच ऐकणे आणि बोलणे या परस्परावलंबी क्रिया आहेत. उदा. एखादा माणूस ठार बहिरा असेल तर त्याच्या वागेंद्रियांमध्ये कुठलाही दोष नसतानादेखील त्याला बोलता येत नाही. कारण आपला स्वतःचा आवाजसुद्धा तो माणूस ऐकू शकत नसल्याने नेमके काय बोलायचे? आणि कसे बोलायचे? याचा अर्थबोध त्याला होत नाही आणि त्याची वाचिक क्षमता तो गमावून बसतो.

भाषिक कौशल्याची दुसरी पायरी म्हणजे भाषण कौशल्य. अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन म्हणजे भाषा. आपल्या मनातील इच्छा, गरजा आणि भावना दुसऱ्यांसमोर भाषेच्याआधारे आपण प्रकट करीत असतो. आपण जे ऐकतो, ज्ञानाचे ग्रहण करतो ते सांगण्याचा प्रयत्न करीत असतो. आपल्याला जे सांगायचे आहे, ते मोजक्या आणि योग्य शब्दात सांगता आले पाहिजे. म्हणून श्रवण कौशल्याबरोबरच भाषण कौशल्यसुद्धा

महत्त्वाचे असे भाषिक कौशल्य आहे. चांगले बोलता येणे ही एक कला असून व्यावहारिक जीवनात ती मनुष्याची एक महत्त्वाची गरज आहे. बऱ्याच वेळा आपण घरात, मित्रांच्यासमवेत न अडखळत, न घाबरता सलग आणि प्रवाहीपणे बोलत असतो. मात्र समूहाच्यासमोर, व्यासपीठावरून काही बोलायचे म्हटल्यास बऱ्याच लोकांना अडथळे निर्माण होतात. खाजगीत बोलणे, गप्पा मारणे आणि समूहासमोर भाषण देणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. समूहाच्या समोर बोलतांना तुमच्याकडे विशिष्ट असे भाषण कौशल्य असावे लागते. म्हणूनच नुसते बोलता आले म्हणजे भाषण कौशल्य आत्मसात झाले असे नसून त्यासाठी हेतुपूर्वक व सातत्यपूर्ण प्रयत्न महत्त्वाचे ठरतात.

भाषण कौशल्यात हेतुपूर्वक बोलणे जसे महत्त्वाचे तसे विचारपूर्वक बोलणेसुद्धा आवश्यक असते. या सर्व गोष्टी वाचन व अनुभवाने सहज शक्य होतात. आज जाहिरात व स्पर्धेच्या युगात नेमके बोलणे अत्यावश्यक ठरते आहे. तुम्ही अथवा तुमचे उत्पादन याविषयी लोकांना सांगितल्याशिवाय कळणार नसते. त्यासाठी योग्य शब्दांत तुम्हाला स्वतःची ओळख करून देता आली पाहिजे. कुठल्याही मौखिक परीक्षेत एक प्रश्न हमखास विचारला जातो, तुमच्याविषयी सांगा अथवा तुमची ओळख करून द्या. अशावेळी बरेच उमेदवार गोंधळून जातात. वास्तविक आपल्याला फक्त आपल्याविषयी विचारलेले असते. जे आपल्याला सर्व माहीत असते मात्र बोलण्याचे कौशल्य पुरेसे आत्मसात नसल्याने माहिती असूनही आपल्याला ती नीट मांडता येत नाही. त्याचा नकारात्मक परिणाम पुढे संपूर्ण मुलाखतीवर- निवड प्रक्रियेवर होतो.

भाषण कौशल्यात भाषा हे प्रमुख आणि प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे भाषण कौशल्य आत्मसात करताना भाषेचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. भाषेतील विविध शब्द, त्यांचे अर्थ, प्रकार, उच्चार, म्हणी, सुभाषिते, अलंकार, काव्य पंक्ती, थोर पुरूषांची गाजलेली विधाने यांचा योग्य वापर भाषण करताना किंवा बोलताना करू शकलो तर आपले बोलणे हे सुंदर, ओघवते व रसाळ होईल. समोरच्याला ते ऐकत राहावेसे वाटेल आणि बोलण्याचा अपेक्षित परिणाम साध्य होईल. त्यासाठी आपले भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे आहे. पर्यटन, विविध अनुभव, चांगल्या ग्रंथांचे वाचन, दर्जेदार भाषणे यामुळे आपण अनुभव संपन्न होत असतो. त्याचा विधायक परिणाम आपल्या संभाषण कौशल्यावर होत असतो.

संपर्क व्यवहारासाठी उत्तम दर्जाचे संभाषण असेल तर ते अधिक परिणामकारक ठरते. व्यक्तीच्या संभाषणातून त्याच्या विचारांची स्पष्टता उदधृत होत असते. बोलण्याचे कौशल्य अवगत असेल तर हेतू साध्य व्हायला मदत होत जाते. बोलण्यातील अचूकपणा संभाषण आणि भाषणात महत्त्वपूर्ण ठरतो. एकवेळ आकर्षक व्यक्तिमत्त्व

नसले तरी चालते परंतु प्रभावी संभाषण कौशल्य असल्यास सदर व्यक्ती सहजपणे ध्येय साध्य करते. आपल्याकडे म्हटले जाते बोलणाऱ्याच्या चिंध्या विकल्या जातात. न बोलणाऱ्याचे सोने पण पडून राहते' मतितार्थ संभाषण कौशल्य समाज व्यवहारात अत्यंत महत्त्वाचे ठरते. बोलणे परिणामकारक होण्यासाठी आशयाची व्याप्ती आणि मांडणी यात सुसूत्रता असावी. भाषण कौशल्यासाठी सातत्यपूर्ण वाचन असले पाहिजे. स्मरणशक्ती, आत्मविश्वास, अभ्यासपूर्ण मांडणी, चिंतन, अनुभव, अनुभूती, सभाधीटपणा अशा अनेक घटकांवर प्रभावी संभाषण अवलंबून आहे.

नव्या बदलांना सामोरे जाताना आता हीच कौशल्य तांत्रिक अंगानेसुद्धा आपण आत्मसात केली पाहिजे. उदा. तुम्हाला युट्युबवर एखाद्या विषयाची माहिती देणारा व्हिडीओ तयार करावयाचा असेल तर वक्त्याला जसा माईक सेन्स आणि माईक मॅनर्स असावा लागतो तसाच शिष्टाचार येथे पाळणे अपेक्षित असते. कॅमेरा आणि त्याच्यासमोर बोलण्याचा सराव करून आपण उत्कृष्ट माहितीपूर्ण चित्रफिती तयार करू शकतो. समुहाइतकेच कॅमेऱ्याच्या समोरसुद्धा भाषिक कौशल्य आणि क्षमतांची कसोटी लागते. तुमच्या व्यक्तिमत्त्वाला एक अनोखी झळाळी देणारे हे कौशल्य तुम्हाला वेगळी ओळख निर्माण करून देण्यासाठी किंवा असलेली ओळख, प्रतिमा अजून ठळक करण्यासाठी अतिशय आवश्यक आहे. अज्ञानातून निर्माण झालेल्या उणीवा आणि शारीरिक पातळीवरील उणीवा प्रयत्नपूर्वक दूर करून भाषण कौशल्य आत्मसात करता येते. उच्चारातील स्पष्टता, आरोह- अवरोह, देहबोली, बोलण्याची गती यांआधारे हे कौशल्य विकसित करता येते.

**वाचन कौशल्ये :**

श्रवण आणि भाषण ही दोन कौशल्य बघितल्यानंतर भाषिक कौशल्यातील तिसरे महत्त्वाचे कौशल्य म्हणजे वाचन कौशल्य! लिहिलेल्या प्रत्येक शब्दाला काही ना काही अर्थ असतो. आपण जेव्हा वाचन करतो तेव्हा फक्त त्या शब्दाचा उच्चार न करता उच्चाराबरोबरच त्या शब्दाचा अर्थसुद्धा समजून घेत असतो. म्हणून वाचन करताना स्पष्ट व अचूक उच्चार महत्वाचे ठरतात. वाचनात आकलनासह केलेले ध्वनी उच्चारण केंद्रस्थानी असते. कारण त्यामुळे शब्दाचा अर्थ समजून घेताना अडचणी निर्माण होऊ शकतात. हे जसे व्यक्तिगत पातळीवर होते तसेच ते सामुहिक पातळीवर होण्याचासुद्धा धोका असतो. उदा. एखाद्या समूहासमोर एखादा वक्ता काही विशिष्ट संहितेचे वाचन करीत असेल आणि ते करताना त्यात जर उच्चारण दोष असतील तर समूहाला अपेक्षित असलेला अर्थबोध त्यातून होणार नाही. शिवाय काही शब्दांच्या चूकीच्या वाचनामुळे, उच्चारामुळे एखाद्या शब्दाचा भलताच अर्थ समूहाला झाल्यास अर्थाचा- अनर्थ होण्यास व वातावरण बिघडण्यास वेळ लागणार नाही. त्यामुळेच

वाचन हेसुद्धा उपयुक्त भाषिक कौशल्य आहे. आणि ते प्रयत्नपूर्वक आत्मसात करावे लागते. लहानपणी प्रत्येक वेळी आपल्याला यासंदर्भात योग्य मार्गदर्शन झालेले असेलच, असे नाही. त्यामुळे साहजिकच काही वाचन दोष आपल्यामध्ये निर्माण झालेले असतात. उदा. वाचताना चूकीचे उच्चारण करणे, नको तितके वेगाने किंवा हळू वाचणे, अस्पष्ट वाचणे, शब्दाचा उच्चार अपूर्ण करणे, विरामचिन्हांचा विचार न करणे. या सर्व उणीवा योग्य ती काळजी घेतली तर निश्चितच दूर केल्या जाऊ शकतात.

चांगल्या व दर्जेदार ग्रंथांच्या वाचनामुळे मनुष्याला ज्ञान व आनंद प्राप्ती जशी होते. तसेच आपल्या व्यक्तिमत्त्वावर चांगले संस्कार होत असतात. वाचनामुळे बहुश्रुतता वाढून व्यक्ती अनुभवसमृद्ध होते. वाचनाचे अनेक प्रकार पडतात. जसे: प्रकट वाचन, मूक वाचन, संदर्भ वाचन, सखोल वाचन, विस्तृत वाचन, गतीवाचन, सामूहिक वाचन इत्यादी. आपल्या गरजेनुसार व परिस्थितीनुसार आपण कसे वाचन करायचे हे ठरवू शकतो. शिक्षणात वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. व्यक्तीचे वाचन कौशल्य कसे आहे, यावरच त्याचे लेखन कौशल्य अवलंबून आहे. त्यामुळे चांगले वाचन करता येणे हासुद्धा व्यक्तिमत्त्व विकासातील अपरिहार्य घटक आहे.

**लेखन कौशल्ये :**

साधारणपणे दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणे तंतोतंत व शुद्ध लिहिण्याला आपण 'लेखन' असे म्हणतो. या लेखनाला आपण प्राथमिक स्वरूपाचे लेखन कौशल्य म्हणू शकतो. कारण सर्जनशील लेखन हा या प्रक्रियेतील सर्वोच्च टप्पा आहे. व्यवहारात आणि दैनंदिन जीवनात आपणास अशा प्राथमिक स्वरूपाचे विविध प्रकारचे लेखन करावे लागते. उदा. एखाद्या वक्याच्या व्याख्यानाचे टिपण काढणे, एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे, संस्थेचे इतिवृत्त लिहिणे, भाषण लिहिणे, लिहून देणे, निबंध लिहिणे, पत्र, अर्ज लिहिणे इत्यादी. लेखन कौशल्यासंदर्भात थोर तत्त्ववेत्ता बेकन असे म्हणतो की, वाचनाने ज्ञान वाढते, सभेत बोलल्याने माणूस हजरजबाबी होतो, मात्र लिहिण्याने माणसाचा विचार नेटका व काटेकोर होतो.' यावरुन लिखाणाचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित होते. समर्थ रामदास स्वामींनी तर हे महत्त्व विशद करताना म्हटले आहे की, 'दिसामाजी काहीतरी लिहित जावे!'

यावरून, लेखन कौशल्य मानवी जीवनातील एक महत्त्वाचे कौशल्य आहे हे लक्षात येते. लेखन कौशल्य आत्मसात करण्यापूर्वी आपणास श्रवण, भाषण आणि वाचन या भाषिक कौशल्याच्या तिन्ही पायऱ्या यशस्वी आत्मसात कराव्या लागतात. आपल्या मनातील विचार, भाव शब्दबद्ध करणे म्हणजेच लेखन होय. हे लेखन नेटके होण्यासाठी कौशल्य असणे महत्त्वाचे ठरते. ज्याप्रमाणे एखादा कलाकार एखादी कला अधिकाधिक सुंदर होण्यासाठी मेहनत घेत असतो त्याप्रमाणे लेखनासाठी

परिश्रम, दृष्टी, शब्दबद्ध करण्याची हातोटी महत्त्वाची ठरते. हातात लेखणी घेतल्या घेतल्या कुणी उच्च दर्जाचे लेखन करू शकत नाही. त्यासाठी परिश्रमपूर्वक, टप्प्याटप्प्याने हे कौशल्य आत्मसात करावे लागते. सुंदर हस्ताक्षरापासून सुरू होणारा हा प्रवास शुद्धलेखनाच्या मार्गाने सर्जनशील लेखनापर्यंत होत असतो. लेखनात बाह्यरचना, शीर्षक, परिच्छेद, वाक्यरचना, शुद्धलेखन, सुसंबद्धता, व्यक्त करण्याची शैली या सर्व बाबी परिणाम करत असतात. लेखन सर्जनशील असेल तर ते लेखकाची ओळख, अस्तित्व निर्माण करण्याची क्षमता ठेवते. त्यामुळे लेखन हे व्यक्तीची ओळख बनत जाते. लेखन परिणामकारक होण्यासाठी मुद्देसूद मांडणी विवेचन सुसूत्रता असायला हवी ते जर असंबद्ध असेल तर रटाळ होत जाईल म्हणून तर्कशुद्ध असणे महत्त्वाचे ठरते. यात वैचारिक लेखन, ललित, गद्य- पद्य माध्यमांसाठी लेखन अशा विविध घटकांचा समावेश करता येईल येईल. लेखनामुळे ज्ञानाचे दीर्घकाळ जतन करून ठेवणे शक्य झाले आहे. पूर्वी सगळा व्यवहार हा मौखिक होता. त्यामुळे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञानाचे संक्रमण होत असताना बऱ्याच गोष्टी एकतर विस्मरणात गेल्यामुळे किंवा सांगणाऱ्या व्यक्तीमुळे त्यात त्रुटी निर्माण होत. लेखनामुळे माहिती आणि ज्ञान जसे दीर्घकाळ जतन करून ठेवता येते. तसेच, ते मोठ्या प्रमाणावर जगभर प्रसारित करता येते. स्थळ- काळाच्या कुठल्याही मर्यादा त्यावर येत नाही. म्हणून लेखन कौशल्य हे अतिशय महत्त्वाचे कौशल्य असून ज्ञान, प्रचार आणि प्रसाराच्या बाबतीत त्याचे मोठे महत्त्व आहे. हे असे असले तरी लेखन करताना अनेक अडचणींचा सामना सुद्धा करावा लागतो. मात्र थोडीशी पूर्वतयारी आणि सकारात्मक मानसिकता असेल तर या सर्व गोष्टींवर निश्चितच मार्ग निघू शकतो. चिंतन, मनन, एकाग्रता, पूर्वतयारी, चांगले वातावरण, गती, सुलेखन, शब्दलेखन, शब्दसंग्रह, योग्य शब्दांचा, म्हणी व प्रतिमांचा वापर या गोष्टी आत्मसात केल्या तर नक्कीच दर्जेदार लेखन करता येते.

भाषा शास्त्रज्ञांच्या मते, 'सर्वच विद्यार्थ्यांमध्ये कमी- अधिक प्रमाणात भाषिक गुणवत्ता असतेच आणि ती विकसित करता येऊ शकते'. त्यादृष्टीने महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांमधील भाषिक गुणवत्तेला चालना देण्यासाठी आणि ती विकसित करण्यासाठी हा नवा अभ्यासक्रम नक्कीच उपयुक्त ठरेल. वरील चारही कौशल्यांचा विचार केला तर असे दिसून येईल की, सगळ्याच विद्यार्थ्यांमध्ये सगळीच कौशल्ये असतील असे नाही. काही विद्यार्थ्यांना लिखाणाचा प्रचंड कंटाळा असतो मात्र त्यांना वाचायला किंवा बोलायला खूप आवडते. काही ठिकाणी याउलट स्थिती पण दिसून येते. काही विद्यार्थी हे वर्गात संपूर्ण वर्षभरात एकही शब्द बोलत नाही. मात्र परीक्षेत चांगले गुण मिळवून वर्गात प्रथम येतात. एकूणच, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये

कौशल्याचे असमान वितरण सुरुवातील दिसून येत असले तरी परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न केले तर वरील चारही भाषिक कौशल्ये आत्मसात करणे अजिबात अवघड नाही.

एकविसावे शतक हे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. या काळात जीवनाच्या आणि व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रचंड प्रभाव आपल्याला दिसून येतो. अशावेळी भाषिक कौशल्यांना तंत्रज्ञानाची जोड दिल्यास व्यवहार गतिमान आणि सुलभपणे पार पडण्यास निश्चितपणे उपयोग होईल. भाषिक कौशल्यांचे संगणकीय उपयोजन करून काम करण्याची तयारी ठेवल्यास नोकरी व व्यवसायाच्या अनेक संधी आणि नवीन पर्याय आपण निर्माण करू शकू. मायक्रोसॉफ्ट ऑफिसची सर्व टूल्स आज आपण व्यवहारात सर्रासपणे वापरतो. भाषिक कौशल्ये तुम्हाला आत्मसात असतील तर या साधनांच्या सहाय्याने तुम्ही अतिशय दर्जेदार व लक्षवेधी काम अतिशय कमी अवधीत तयार करू शकतात. नव- प्रसारमाध्यमांच्यामध्ये सुद्धा या कौशल्यांचा खुबीने उपयोग करून तुम्हाला तुमच्या कामाची गुणवत्ता वाढवता येईल. पॉवर पॉईंटसारख्या सादरीकरणाच्या प्रणालीत कमीत कमी शब्दांमध्ये जास्तीत जास्त आशय पोहोचविण्याचे कौशल्ये अंगी असावे लागते. अशावेळी आपले वाचन दांडगे असेल तर शब्दांची अचूक निवड, कमीत कमी वाक्ये मात्र तरीही संपूर्ण अर्थ त्यातून व्यक्त कसा होईल, याची विशेष काळजी घ्यावी लागते. अशावेळी केवळ भाषेवर प्रभुत्व असून चालत नाही तर भाषिक कौशल्यसुद्धा चांगल्या पद्धतीने आत्मसात केलेली असतील तर तुमचे सादरीकरण निश्चितच दर्जेदार होते.

आता कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तर सर्वांनाच अशा प्रकारे काम करावे लागत असून येत्या काळात आपल्या कामाचा फार मोठा भाग संगणकाने व्यापलेला असणार आहे. अशावेळी भाषिक कौशल्यांचे संगणकीय उपयोजन ही काळाची गरज बनलेली असेल.

**संदर्भ :**


१. लोकचेतना अभियान, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी २०११

२. मराठी भाषेची संवाद कौशल्ये- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

३. खिरे उषा व सायगावकर अंजली: वाचन आणि लेखन कौशल्ये - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

४. गोविलकर लीला: पाटणकर जयश्री, व्यवहारिक मराठी, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे; २००४


ᴄᴙᴄᴙ